**नि.फौ.ख.क्र.२८/२००९**
सरकार – वि.- अमित कळमरकर
**निशाणी क्र. ५५**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – सुनिल पांडुरंग माने - पोलीस साक्षीदार
वय – ५३ वर्षे, व्यवसाय – पोलीस उप.निरीक्षक., गुन्हे अन्वेषण विभाग, लोहमार्ग पो.स्टे, पुणे,
सध्या रा. - नवी सांगवी, पुणे.

**<u>फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एस.काळे यांचे मार्फत सुरु-</u>**

सन २००९ मध्ये माझी नेमणुक पोलीस शिपाई या पदावर गुन्हे अन्वेषण शाखा, लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे येथे होती. दि. १९/०१/२००९ रोजी माझी नेमणुक पुणे रेल्वे स्टेशनच्या फलाटावर करण्यात आली होती. त्यादिवशी गरीबरथ एक्सप्रेस चालु होणार होती त्यामुळे मला बंदोबस्त कामी तेथे नेमण्यात आले होते. माझे सोबत पो.शि. लाखे देखील होते. आम्ही प्लॅटफॉर्म क्र. ६ च्या बाजुस थांबलो होतो तेव्हा दोन इसम एका व्यक्तीस बळजबरी घेवुन जात असताना आम्हाला दिसल्या. आम्ही त्यांना विचारले असता त्यांनी तो इसम त्यांचा भाऊ असल्याचे सांगितले. सखोल चौकशीमध्ये असे दिसले की, सदरील इसमाला त्यांनी डेक्कन एक्सप्रेस या ट्रेनमधुन बळजबरीने उतरवले होते व त्याच्याकडुन पैशाची मागणी केली होती. आरोपीने त्याच्याकडुन ४००/- रुपये घेतले होते. त्यानंतर मी निरीक्षक, गुन्हे अन्वेषण शाखा यांना अहवाल दिला. या गुन्हाचा पुढील तपास पी.एस.आय मारकड यांनी केला होता. मी त्या आरोपीस पाहिल्यास ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.01.28 17:16:04 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. २८/०१/२०२६